REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# स्वराज्यरक्षक किल्यांचे सरनोबत आणि किल्लेदार सरदार ढमढेरे

डॉ. पद्माकर ज्ञानोबा गोरे
साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय तळेगाव ढमढेरे, ता. शिरूर, जि. पुणे.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या सक्षम व समर्थ नेतृत्वाखाली मराठयांचे स्वतंत्र व सार्वभौम राज्य महाराष्ट्रात उदयास आले. स्वराज्याची स्थापना, विस्तार व संरक्षणामध्ये या परिसरातील किल्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. स्वराज्यस्थापनेतील किल्यांचे महत्व ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्यांच्या निर्मीतीसाठी व डागडुजीसाठी प्रचंड मोठया प्रमाणात पैसा खर्च केला. एका गडकोटामध्ये जन्मलेला, जन्मभर गडकोट जिंकण्याचा ध्यास लागलेला, त्यांच्यावर निरतिशय प्रेम करणारा, एका अजेय दुर्गावर स्वत:ची राजधानी निर्मिणारा, तिथेच स्वत:ला राज्याभिषेक करवून घेणारा आणि अंतिम श्वासही त्याच दुर्गावर घेणारा पुरूष एक शिवछत्रपती वगळता इतिहासात दुसरा कुणी झाला नाही.[१] 'हें राज्य तरी तीर्थरूप थोरले कैलासवासी स्वामींनी गडावरूनच निर्माण केलें.' या एका वाक्यातच स्वराज्यस्थापनेतील किल्यांचे महत्व रामचंद्रपंत अमात्य यांनी सांगीतले आहे. गिरीदुर्ग, स्थलदुर्ग, जलदुर्ग व वनदुर्ग (घनदाट अरण्य) असे किल्यांचे चार प्रकार होते. यापैकी छत्रपती शिवाजी महाराजांनी या परिसरात नैसर्गीकरित्या उपलब्ध असलेल्या गिरीदुर्गाचा स्वराज्य स्थापनेसाठी अचूकपणे उपयोग करून घेतला. भारतामध्ये किल्ले बांधणीची प्राचीन परंपरा असली तरीही किल्यांचे महत्व ओळखून आपल्या राज्यासाठी त्याचा अचूक वापर प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांनीच केला. गडकोटा विषयी छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार सांगताना रामचंद्रपंत अमात्य म्हणतात, 'गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे खजिना, गडकोट म्हणजे सैन्याचे बल, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राणसंरक्षण...'[२]

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वर्चस्वाखाली जवळपास साडे तिनशे किल्ले होते. यातील काही किल्ले शिवपूर्वकाळापासून अस्तित्वात होते. तर काही किल्ले त्यांनी नव्याने बांधले. किल्यांच्या सहाय्यानेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यावरील अनेक संकटे यशस्वीरित्या परतवून लावली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतरही स्वराज्य टिकून राहिले. त्याचे श्रेय महाराजांना आणि त्यांनी निर्माण केलेल्या किल्ल्यांना जाते.[३] सुरक्षिततेच्या दृष्टीने किल्ला एकाच व्यक्तीच्या हाती न देता प्रत्येक किल्यावर हवालदार, सबनीस व कारखानीस असे तीन अधिकारी त्यांनी नियुक्त केले. हवालदार हा अधिकारी किल्याचा प्रमुख असून किल्याच्या संरक्षणाची जबाबदारी त्याच्यावर होती. किल्यावरील हिशोब ठेवण्याचे काम सबनीस करत असे तर गडावरील कारखान्यांचा दप्तरदार कारखानीस होता. हे तिनही अधिकारी अपापल्या कार्यामध्ये दक्ष राहून छत्रपतींशी एकनिष्ठ असत. सरनोबत हा किल्यावरील आणखी एक महत्वाचा अधिकारी होता. छत्रपती शिवाजी महाराजांचे किल्यावरील या अधिका-यांच्या नियुक्तीविषयीचे धोरण सांगताना सभासद म्हणतो, 'गडावरि लोक हवालदार व सरनोबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यांपैकी घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राम्हण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखानीस परभू ठेवावे.[४]

स्वराज्याची पहिली राजधानी राजगड किल्ला होता. पुढे रायगड किल्ला स्वराज्याची राजधानी बनला. रायगड किल्ला अतिशय दुर्गम प्रदेशात असल्याने शत्रूंना हा किल्ला जिंकणे सहजासहजी शक्य होणार नव्हते. कोकणच्या बाजुची बंदरे रोखण्याला व देशावरच्या मुलखावरहि जरब ठेवण्याला हा राजधानीचा किल्ला महत्वाचा होता.[५] रायगड किल्याच्या दुर्गमतेबद्दल सभासद म्हणतो, 'राजा खासा जाऊन पाहाता गड बहूत चखोट, चौतर्फी गडाचे कडे तासिल्याप्रमाणे, दीड गांव उंच, पर्जन्यकाळी कडियावरी गवत उगवत नाही, आणि धोंडा तासींव एकच आहे. दौलताबादही पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीन थोडका. दौलताबादेचे दशगुणी गड उंच. असे देखोन बहुत संतुष्ट जाले आणि बोलिले, तक्तास जागा गड हाच करावा.'[६] रायगड किल्याच्या बळकटतेबद्दल मोगल इतिहासकार ईश्वरदास नागर म्हणतो, 'किल्ला अतिशय मजबूत होता. कोकणात त्याच्या तोडीचा दुसरा किल्ला नव्हता. किल्याकडे जाण्यासाठी एकच वाट होती. किल्याभोवती मोठमोठे डोंगर आल्यामुळे किल्याखाली सुरूंग लावणे अशक्य होते.'[७]

६ जून १६७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा विधीयुक्त राज्याभिषेक झाला. या राज्याभिषेकामुळे भारताच्या राजकीय पटलावर मराठयांचे स्वतंत्र व सार्वभौम राज्य अस्तित्वात आले. स्वराज्याच्या राजधानीचा मान रायगड किल्यास मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठयांचे राज्य जिंकून घेण्यासाठी औरंगजेबाने प्रचंड सैन्यासह स्वराज्यावर आक्रमण केले. पण रायगड आणि इतर किल्यांच्या सहाय्याने छत्रपती संभाजी महाराजांनी औरंगजेबाचा प्रखर प्रतिकार केला. छत्रपती संभाजी महाराज खेळणा किल्यावरून संगमेश्वर मार्गे रायगडाकडे जात असताना संगमेश्वर मुक्कामी १ फेब्रुवारी १६८९ रोजी मोगलाकडून पकडले गेले.[८] आणि ११ मार्च १६८९ रोजी वढु बुद्रुक येथे ठार केले. या कठीण समई डगमगून न जाता महाराणी येसूबाईनी रायगड किल्यावरून मोठया हिंमतीने औरंगजेबाविरूध्दचा लढा सुरू ठेवला. मराठयांची राजधानी असलेला रायगड किल्ला जिंकून मराठयांचे राज्य संपुष्टात आणण्यासाठी औरंगजेबाने आपला शक्तीशाली सरदार जुल्फीकारखान यास प्रचंड सैन्य देऊन रायगड जिंकण्यासाठी पाठवले. जुल्फीकारखानाने २५ मार्च १६८९ रोजी रायगडास वेढा दिला. स्वराज्याच्या दृष्टीने अडचणीच्या व अतिशय कठिण प्रसंगी महाराणी येसूबाईच्या नेतृत्वाखाली जवळ जवळ सात महिने मराठयांनी रायगडाचे संरक्षण केले. पण ३ नोव्हेंबर १६८९ रोजी जुल्फीकारखानाने रायगड किल्ला जिंकून घेतला. औरंगजेबाने रायगड किल्याचा किल्लेदार म्हणून राजा सूरसिंग याची नेमणूक केली. पुढे जंजिरेकर सिद्दीकडे रायगड किल्ला सोपवण्यात आला होता.

छत्रपती शाहू महाराजांनी १२ जानेवारी १७०८ रोजी स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. मराठी सत्तेचा विस्तार करण्याचे ठरवून त्यांनी आक्रमक साम्राज्य विस्ताराचे धोरण स्वीकारले. मराठा राज्याची राजधानी असलेला वैभवशाली रायगड किल्यावरील सिद्दींच्यां वर्चस्वाखाली मुक्त करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. ५ जून १७३३ रोजी मराठयांनी रायगड किल्ला जिंकून घेतला. रायगड किल्ला जिंकून घेण्यात पंतप्रतिनिधी, फत्तेसिंगराव भोसले आणि यशवंतराव पोतनिस यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. ४४ वर्षाच्या पारतंत्र्यानंतर स्वराज्याची राजधानी असलेला रायगड किल्ला मराठयांच्या वर्चस्वाखाली आला. छत्रपती शाहू महाराजांनी रायगड किल्ला स्वत:कडे ठेवला. आपले खाजगीचे कारभारी खासनीस यशवंतराव पोतनिस यांच्याकडे रायगडचा कारभार सोपवला. इ. स. १७३३ पासून इ. स. १७७२ पर्यंत म्हणजेच जवळ जवळ ३९ वर्षे पोतनिस घराण्याने मोठया धैर्याने व शौर्याने मराठयांची राजधानी असलेल्या रायगडाचे रक्षण केले.

छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती रामराजा यांनी रायगडाच्या संरक्षणाची जबाबदारी पेशवेंवर सोपवण्याचा निर्णय घेऊन ३० ऑगस्ट १७७२ रोजी रायगडाचे कारभारी विठ्ठलराव पोतनिस व किल्लेदार यशवंतराव मोरे यांना आज्ञापत्र पाठवले. १८ मार्च १७७३ रोजी आप्पाजी हरी यांनी रायगड किल्ला आपल्या ताब्यात घेऊन पेशवेंच्या वतीने कारभार सुरू केला. हंसाजी खैरे यांना रायगडाचा किल्लेदार म्हणून नियुक्त केले. इ. स. १७७३ — ७४ मध्ये बाळोजी बीन धोंडजी ढमढेरे हे सरनौबत म्हणून रायगडावर काम करीत होते.[९] हवालदार, सबनीस व कारखानीस या अधिका-यांबरोबरच सरनोबत हा गडावरील महत्वाचा अधिकारी होता. हवालदाराच्या अनुपस्थितीमध्ये किल्लाचा कारभार सरनोबत पहात

असे. हवालदाराच्या आज्ञेत राहून त्याची सत्ता गडाच्या मेटांवर, अलंगांवर, सैनिक आणि सैन्यावर चाले. गडाची लष्करी सुरक्षितता, सैन्याची व्यवस्था, पहा-याच्या पध्दती, युध्दजन्य परिस्थितीत गड झुंजविण्याच्या योजना, सैन्यभरती इ. अनेक कार्याचा समावेश सरनोबतीत होत असे.[१०]

छत्रपती शाहू महाराजांच्या कारकीर्दीत व त्यानंतरच्याही काळात मराठी सत्तेचा विस्तार दक्षिण व उत्तर भारतात झाला. या काळातही मराठयांच्या वर्चस्वाखालील प्रदेशातील किल्यांचे महत्व टिकून होते. सातमाळा — अजिंठे या रांगेत असलेल्या किल्यांचे स्थान महत्वपूर्ण होते. कारण उत्तर भारतातून दक्षिण भारतात येणारे रस्ते या रांगेला वळसा घालून येत होते. या रस्त्याच्या सुरक्षिततेसाठी व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी हे किल्ले उपयुक्त ठरत होते. सातमाळा — अजिंठे व त्याचे फाटे यांमध्ये देवगिरी, चांदवड, घोडप, हातगड, अहीवंत, राजधैर, अंकाई, टंकाई इ. अनेक गिरदुर्ग आहेत. हे गिरीदूर्ग आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्यासाठी मोगल आणि मराठे यांमध्ये वारंवार संघर्ष झाले.[११] प्रदेश संरक्षणा व दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या चांदवड व हातगड या किल्यावर किल्लेदार म्हणून ढमढेरे सरदार कार्यरत होते. इ. स. १७५२ — ५३ मध्ये मल्हारराव होळकरांच्या ताब्यातील चांदवड किल्याचे किल्लेदार (हवालदार) म्हणून पिराजी ढमढेरे कार्यरत होते.[१२] मल्हारराव होळकर हे मराठेशाहीतील पराक्रमी व शूर सरदार म्हणून प्रसिध्द आहेत. मराठी सत्तेचा उत्तर भारतात विस्तार करण्यामध्ये त्यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली होती. त्यांची कर्तबगारी व स्वामीनिष्ठा लक्षात घेऊन चांदवड प्रदेशाची जहागिरी त्यांना देण्यात आली.

सातमाळा — अजिंठे व त्यांच्या फाटयामधील हातगड हा आणखी एक महत्वाचा किल्ला होता. इ. स. १८०९ — १० मध्ये पेशवे यांच्याकडील कोणत्या सरदाराकडे कोणते किल्ले होते हे दर्शवणा-या यादीमध्ये हातगड किल्ला खंडेराव त्रिंबक ढमढेरे यांच्याकडे होता.[१३] इ. स. १८०९ — १० च्या सुमारास खंडेराव त्रिंबक ढमढेरे हे हातगड किल्याचे किल्लेदार होते. जॉन ब्रिग्ज या ब्रिटिश अधिका-याने अहवालात हातगड किल्ला पेशव्यांचे सरदार ढमढेरे यांच्या ताब्यात असल्याची माहिती लिहून ठेवली आहे.[१४]

मराठी सत्तेच्या संरक्षणासाठी व विस्तारासाठी तळेगाव ढमढेरे गावातील ढमढेरे घराण्यातील अनेक सरदारांनी योगदान दिले. मराठी सत्तेच्या उदयापासून ते अस्तापर्यंत मराठी सत्तेसाठी योगदान देणा-या महाराष्ट्रातील मोजक्या घराण्यामध्ये ढमढेरे घराण्याचा समावेश होतो. आपल्या पराक्रमाणे मराठी सत्तेचा विस्तार व संरक्षण करत असतानाच मराठा राज्याच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या किल्यांचे संरक्षण करण्याचे महत्वपूर्ण कार्य ढमढेरे सरदारांनी केले. स्वराज्य स्थापनेतील व संरक्षणातील रायगड किल्याने महत्वपूर्ण भूमिका निभावली होती. रायगड किल्याच्या दुर्गमतेमुळेच छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची राजधानी म्हणून या किल्याची निवड केली होती. त्यामुळे मराठयांच्या इतिहासात रायगड किल्यास विशेष महत्व होते. रायगड किल्याचे महत्व लक्षात घेऊन नारायणराव पेशवे यांनी किल्याचे सरनोबत म्हणून आपल्या विश्वासातील सरदार बाळोजी ढमढेरे यांची नियुक्ती केली होती. बाळोजी ढमढेरे यांचे कर्तृत्व व निष्ठा लक्षात घेऊनच स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्याची जबाबदारी बाळोजी ढमढेरे यांच्यावर सोपवली होती. आपल्या कर्तृत्वाने बाळोजी ढमढेरे यांनी रायगड किल्याचे संरक्षण केले. नारायणराव पेशवे यांनी आपल्यावर ठेवलेला विश्वास व राजधानीच्या संरक्षणाची दिलेली जबाबदारी बाळोजी ढमढेरे यांनी मोठया निर्धारपूर्वक पार पाडली.

लष्करी डावपेच व दळणवळणाच्या दृष्टीने सातमाळा व अजिंठे या रांगेतील किल्यांना मराठी सत्तेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्व होते. मराठी सत्तेवर उत्तरेतून होणारे मोगलांचे आक्रमण थोपवून धरण्यासाठी या प्रदेशातील किल्ले व दळण वळणाच्या वाटा महत्वपूर्ण होत्या. दक्षिणेतून उत्तरेकडे जाणा-या प्रवासाच्या मार्गावर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी चांदवड किल्याचे किल्लेदार म्हणून मल्हारराव होळकरांनी आपल्या विश्वासातील पिराजी ढमढेरे यांची किल्लेदार म्हणून नियुक्ती केली. ही नियुक्ती करताना पिराजी ढमढेरे यांचे कर्तृत्व व स्वामीनिष्ठा मल्हारराव होळकरांनी लक्षात घेतली होती. अशा महत्वपूर्ण प्रदेशातील किल्यांचे किल्लेदार म्हणून ढमढेरे सरदारांनी गौरवास्पद कामगिरी केली. मल्हारराव होळकर यांनी चांदवड परिसर व किल्याच्या संरक्षणाची मोठया विश्वासाने सोपवलेली जबाबदारी आपल्या पराक्रमाने पिराजी ढमढेरे यांनी यशस्वीरित्या पार पाडली. या प्रदेशाचे संरक्षण करण्याबरोबरच दक्षिण

भारतातून उत्तर भारतात जाणा-या मार्गावर त्यांनी देखरेख व नियंत्रणही केले. सातमाळा — अजिंठे व त्यांच्या फाटयामधील हातगड या दुस-या महत्वाचे किल्लेदार खंडेराव त्रिंबक ढमढेरे होते. त्यांनीही हातगड किल्याच्या संरक्षणाची महत्वाची जबाबदारी पार पाडली. हातगड किल्याच्या संरक्षणाबरोबरच आसपासच्या परिसरावर त्यांनी नियंत्रणही ठेवले होते. मराठयांची राजधानी असलेल्या रायगड किल्याचे सरनोबत आणि चांदवड व हातगड या महत्वाच्या किल्यावर किल्लेदार म्हणून ढमढेरे सरदार होते. सरनोबत आणि किल्लेदार म्हणून त्यांच्यावर सोपवलेली जबाबदारी त्यांनी मोठया विश्वासाने पार पाडली. मराठयांच्या इतिहासातील ढमढेरे सरदारांचे हे योगदान आपणास विसरता येणार नाही.

## * संदर्भ आणि तळटिपा *


१ जयसिंगराव पवार (संपा.), **छत्रपती शिवाजीमहाराज स्मृतिग्रंथ**, पुणे, २०११, पृ. १२८.

२ अ. रा. कुलकर्णी, (संपा. व अनु.), **रामचंद्रपंत आमात्यांचे आज्ञापत्र मोडी - मराठी - इंग्रजी**, (मुळ लेखक - रामचंद्रपंत अमात्य), पुणे, २००७, पृ. १७७.

३ जयसिंगराव पवार, भालबा विभूते (संपा.), **महाराष्ट्राचा इतिहास : मांडणी व पुनर्मांडणी**, कोल्हापूर, २०११, पृ. १०२.

४ र. वि. हेरवाडकर, (संपा.), **शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर)**, (मुळ लेखक - कृष्णाजी अनंत सभासद) पुणे, २०१४, पृ. ३०.

५ न. चि. केळकर, द. वि. आपटे (संपादकीय प्रस्तावना), **शिव — चरित्र — निबंधावली**, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०१५, पृ. ३५७.

६ र. वि. हेरवाडकर (संपा.), **शिवछत्रपतींचे चरित्र (सभासद बखर)**, (मुळ लेखक) कृष्णाजी अनंत सभासद, पुणे, पुनर्मुद्रण २०१४, पृ. ८८.

७ द. पं. जोशी, उषा जोशी (संपा.), **समग्र सेतुमाधवराव पगडी**, (प्रका.) हैद्राबाद, द्वितीय आवृत्ती, २०१७, पृ. २६.

८ गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत खंड २ उग्रप्रकृती संभाजी स्थिरबुध्दी राजाराम**, मुंबई, चौथे पुनर्मुद्रण २०१७, पृ. ११०.

९ शांताराम विष्णु आवळसकर, **रायगडची जीवनकथा**, मुंबई, पुनर्मुद्रण २०१५, पृ. १६२.

१० महेश तेंडूलकर, **शिवकालातील दुर्ग व दुर्गव्यवस्था**, पुणे, २००९, पृ. ३५.

११ अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), **मराठयांचा इतिहास खंड पहिला**, पुणे, २००६, पृ. ३२३ — ३२४.

१२ वा. रा. ठाकूर (संपा.), **होळकरशाहीच्या इतिहासाची साधने भाग १**, इंदोर, १९४४, पत्र क्र. ९८, पृ. २१७.

१३ गो. स. सरदेसाई (संपा.), **पेशवे दप्तरातुन निवडलेले कागद खंड ३१ जमाव विभागातील कागद**, मुंबई १९३३, पत्र क्र. १६६, पृ. १४६ ते १५१.

१४ Arvind Deshpande (Edit.), **John Briggs In Maharashtra (A Study of District Administration Under Early British Rule)**, Delhi, 1987, P. 29.